**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १८ ड

ॐ ॐ ॐ

## भूकंप, आगी लागणं, पूर येणं?

असे हे धरणीकंप, आगी लागणं, पूर येणं हे का होतात? का? या नैसर्गिक आपत्तींच्या मागे कोणतं मूळ कारण असतं, हे माझ्या मित्रांनी काळजीपूर्वक लक्षात घ्यावं.

स्वामींनी समजावून द्यायला सुरुवात केली. ''आजकाल माणसांना अमर्याद इच्छा, अपेक्षा असतात. तो फार अधाशी झाला आहे आणि त्याकरता निसर्गाची पिळवणूक करत असतो. त्याकरता तो पृथ्वीच्या पोटात खूप खोलवर जाऊन निरनिराळे धातू काढत असतो. तो पगथ्वीच्या पोटात खूप खोल, हजारो फूट खोल जाऊन, अशुद्ध धातू, दगड, भूमातेच्या पोटातून खणून काढत असतो. तो रॉकेल आणि पेट्रोल मिळवण्यासाठी सागराच्या तळापर्यंत जाऊन खोलवर खणत असतो. त्याचाच परिणाम म्हणजे पृथ्वीचा तोल गेला आहे. जेव्हा पृथ्वीचा तोल जातो, तेव्हा अशा प्रकारचे पूर येतात. जेव्हा पृथ्वीच्या निरनिराळ्या भागात कुठे उथळ जागा, कुठे खोलवर मोकळ्या (पोकळी) जागा निर्माण होतात तेव्हा मोठे धरणीकंप होतात. म्हणजे हे धरणीकंप आणि पूर येणं हे माणसाच्या कृत्यांमुळेच होतात. देवाने काहीच केलेलं नसतं. माणसांनी केलेल्या पृथ्वीवरील छळांची प्रतिक्रिया या सर्व आपत्तींमध्ये तयार होतात.

## ''जानेवारी २००१ पासूनच्या घटना''

आपल्याला हेही समजलं आहे की ३१ जानेवारीला, जेव्हा भगवान बंगलोरला गेले होते, तेव्हा त्यांनी कर्नाटक राज्यातील अलिके नावाच्या एका गावाला भेट दिली. स्वामींनी आम्हाला सांगितलं, ''तुम्हाला माहीत आहे का, मी तिथे पूर्णपणे कानडी भाषेत बोललो, तेलगुमधून नाही. सर्व श्रोत्यांना खूप आनंद झाला कारण मी त्याच्या मातृभाषेतून बोललो.''

''अर्जुनाला बारा नामाभिधाने होती.''

आता मी पुढच्या घटनेकडे वळतो. त्या संध्याकाळी भगवान महाभारतावर बोलले. प्रमिलार्जुनीयनाम, गोग्रहनम, अभिमन्यू आणि परिक्षिताची गोष्ट इत्यादी बऱ्याच गोष्टींबद्दल ते बोलले. प्रत्येक विषयावरील गोष्ट ते अशी सांगत होते की आम्हाला त्या प्रत्येक प्रसंगाची गोष्ट त्याच वेळेस घडत आहे असे वाटत असे. प्रत्येक गोष्ट ते अशा शैलीत सांगत की आम्हाला त्या प्रसंगाचे रेखीव वर्णन, छायाचित्रण आणि संपूर्ण देखाव्याचे नाट्यपूर्ण चित्रीकरण अनुभवता आले. हे फक्त भगवानच करू शकतात, इतर कोणाला जमणार नाही.

त्यांनी महाभारतातील अर्जुन नावाच्या महत्त्वाच्या भूमिकेचा उल्लेख केला. भगवान म्हणाले, ''अर्जुनाला बारा नामाभिधाने होती. ही सर्वांत उच्च नामाभिधाने होती.''

मग मी म्हणालो, ''स्वामी, बारा पदव्या? त्याला ह्या सर्व पदव्या कशा मिळाल्या? धनुर्विद्येतील त्याच्या प्राविण्यामुळे त्याला मिळाल्या का? त्याच्या धैर्याचा सन्मान म्हणून, का त्याच्या विजयांना अभिवादन म्हणून

किंवा कदाचित त्यांनी मिळवलेल्या दुष्ट प्रवृत्तीवरील विजयाकरता कौतुक करण्यासाठी असेल का?

स्वामी म्हणाले, ''नाही, नाही. त्याने ही बारा नावे मिळवली ती त्याच्या मनोनिग्रह, आध्यात्मिक शिस्त आणि तपश्चर्या या साधनेवर. त्याने भगवंताची कृपा जिंकून घेतली होती म्हणून त्याला परमेश्वराकडून मिळालेले आशीर्वाद आहेत.

स्वामींनी अर्जुनाची अशा प्रकारे स्तुती केली.

## ''अर्जुन हा भीष्मांपेक्षा महान होता का?''

ठीक, मी शांत राहणारा माणूस नाही. मला महाभारतातील एक दुसरी व्यक्तिरेखा माहीत आहे. ती म्हणजे भीष्म. भीष्म ही ज्येष्ठ व्यक्ती होती. वयोवृद्ध, एक शांत, स्थिरचित्त व्यक्ती होती. ते ज्ञानी आणि त्यागी पुरूष होते. त्याच्याप्रमाण पुरूष तुम्हाला दुसरीकडे सापडणार नाही, मिळणार नाही.

''स्वामी, अर्जुन हा भीष्मांपेक्षा महान होता असं तुम्हाला वाटतं का?''

भगवानांनी माझे विचार ओळखले आणि ताबडतोब उत्तर दिलं.

''भीष्म ही एक महान व्यक्ती होती यात शंका नाही. ते नि:संशय ज्येष्ठ व्यक्ती होते. हुशार, स्थिरचित्त, शिस्तप्रिय, प्रामाणिक आणि उच्च कोटीचा भक्त होता. पण तो वाईट प्रवृत्तीच्या सहकाऱ्यांमध्ये सापडला होता. त्यांनी दुष्ट कौरवांची पाठराखण केली. आणि दुसरीकडे अर्जुन हा कधीच वाईट लोकांमध्ये नव्हता. जरी तुलनेने अर्जुन हा भीष्मांपेक्षा लहान असला तरी तो सदाचारीच राहिला कारण त्याने नेहमी चांगल्या माणसांचीच संगत ठेवली. म्हणून अर्जुन हा भीष्मांपेक्षा श्रेष्ठ ठरतो.''

## ''अभिमन्यूचा युद्ध करण्याचा निर्णय''

आणि मग स्वामींनी अभिमन्यूची गोष्ट सांगितली. अभिमन्यू हा अर्जुनाचा पुत्र होता. त्याचे असे झाले की अभिमन्यूला त्याच्या शत्रूंनी आव्हान दिले होते. त्यामुळे त्याला रणांगणावर जाऊन युद्ध करावे लागले. तो अगदी तरुण असूनही युद्धात त्याला मरण आले.

''स्वामी, अभिमन्यू हा तरुण युवक होता. विवाहित होता आणि त्याची पत्नी गर्भवती होती. त्याचे वडील अर्जुन आणि त्याचे मामा कृष्ण हे त्या समयी दूर होते. गरीब बिचारा अभिमन्यू! त्याला इतक्या लहान वयात मरण आले. काय हे दुर्दैव! स्वामी, मी असं ऐकलं की अभिमन्यूने त्याची माता सुभद्रा हिची आज्ञा पाळली नाही.''

त्याच्या मातेने त्याला सांगितले होते, ''माझ्या प्रिय मुला, तू आता रणांगणावर जाऊ नकोस. तुझे पिता इथे नाहीत, तुझे मामाही इथे नाहीत आणि तुझी पत्नी गर्भवती आहे. तू आता जाऊ नकोस.''

''स्वामी, मातेची आज्ञा न पाळता युद्धावर जाणं हे अभिमन्यूने योग्य केलं का?''

मला असं वाटलं होतं की मी अभिमन्यूची ही चूक दाखवून देत आहे; पण आमच्या प्रेमळ परमेश्वराने मला अशा गैरसमजुती बाळगण्यास परवानगी दिली नाही.

ते म्हणाले, ''असं बघ अनीलकुमार, जेव्हा शत्रू येऊन तुम्हाला आव्हान देतो तेव्हा प्रत्येक योद्ध्याने, क्षत्रियाने रणांगणावर ताबडतोब जाणे हे कर्तव्यच असतं. त्यांनी पळवाटा काढू नयेत किंवा एखादी सबब सांगू नये.''

''म्हणजे अभिमन्यूने मातेच्या आज्ञा पाळल्या नाहीत कारण त्याच्या शत्रूंनी त्याला आव्हान दिलं होतं आणि तो खरा योद्धा होता. जर तो गेला नसता तर त्याचे वडील परत आल्यानंतर त्यांच्या काय भावना झाल्या

असत्या? त्याच्या पित्याला त्याच्याविषयी लाज वाटली असती. त्यांना असं वाटलं असतं, हा मागे राहणारा माझाच मुलगा आहे का? मी एक महान योद्धा आहे आणि माझ्या मुलानेही माझ्यासारखेच योद्धा बनायला हवे. त्याच्या शत्रूंनी त्याला आव्हान दिल्यावर तो स्वगृहीच राहिला असता तर ती किती लाजिरवाणी गोष्ट झाली असती.'' त्याच्या वडिलांच्या अशा भावना झाल्या असत्या.

''अभिमन्यूला अशी गोष्ट व्हायला नको होती म्हणून त्याने शत्रूच्या आव्हानाला तोंड दिलं. त्याने शत्रूशी एकहाती सामना केला आणि त्याला धारातीर्थी पडावं लागलं. शेवटी ही सर्व त्या परमेश्वराची दैवी योजनाच होती. अभिमन्यूला माहीत होतं की युद्धाची सर्व मांडणी द्रोणाचार्यांनी आखलेली होती, त्याला हेही माहीत होतं की त्याला एकट्याला शेकडो ज्येष्ठ व्यक्तींबरोबर युद्ध करायचं होतं. पण त्याने आपलं नाव, प्रतिष्ठा आणि आपल्या घराण्याची आणि पित्याची पत सांभाळण्याकरता मृत्यूही पत्करला.''

हे असं भगवान म्हणाले.

## ''क्षत्र म्हणजे काय?''

नंतर मी विचारलं, ''स्वामी, माझा एक असा प्रश्न आहे की 'क्षत्र' म्हणजे काय?''

हा एक संस्कृत शब्द आहे आणि इंग्लिशमध्ये त्याचा अर्थ 'धैर्य' असा होतो हे मला माहीत होते. मी हा प्रश्न स्वामींना विचारला कारण ते नवीन व्याख्या आणि नवेनवे अर्थ सांगण्यासाठी प्रसिद्ध आहेत.

''हो'' स्वामींनी मागे वळून हास्य केले आणि म्हणाले, ''पराक्रम, धैर्य हे सदाचार, चारित्र्य आणि प्रामाणिकपणा यांच्याबरोबरच असतात आणि त्याला 'क्षत्र' असे म्हणतात.

माझ्या मित्रांनो, आपण हे समजून घेतलं पाहिजे की दुसऱ्या माणसाला ठार मारणं हे धैर्याचे कृत्य आहे, पण ते 'क्षत्र' नाही. तुम्हाला समजलं का? एखाद्या माणसाला मार देणं ही कदाचित धैर्याची कृती असेल, पण ते 'क्षत्र' नव्हे. स्वत:चे चारित्र्य सांभाळणं, मरणासाठी तयार असणं आणि चारित्र्य सांभाळण्यासाठी लढा देणं म्हणजे 'क्षत्र.'

भगवानांनी त्याची अशी व्याख्या सांगितली आहे. सध्याच्या समाजाने हे समजलं पाहिजे की लोकक्षोभ आणि शांतताभंग यांच्याबरोबर सामना करताना क्षत्र, खरा व सात्विक राग हा असलाच पाहिजे. जाळपोळ आणि हिंसा सर्वत्र चालू असते पण त्याला आपण धैर्य म्हणणार नाही. या सर्व कृती म्हणजे हुल्लडबाजी, अनागोंदी आणि बेकायदेशीर गोष्टी आहेत. आपल्याला आज शौर्य, धैर्य आणि सात्विक राग यांची गरज आहे.

भगवानांचे तुम्हाला आशीर्वाद असोत.

धन्यवाद! साईराम!

***